**केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ करिता अनुदानाचे वितरण.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: राकुला -२०१९/प्र.क्र.५०/विसयो**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १७ मे, २०१९.

<u>वाचा</u> :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/प्र.क्र.१७५/ विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.मकोनी-१०१०/प्र.क्र.३२/कोषा-प्र.५, दि. १२ जुलै, २०११.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९.
४. शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बीजीटी २०१९/प्र.क्र.१६/ अर्थसंकल्प, दिनांक १० एप्रिल, २०१९.

**शासन निर्णय :-**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये २५,००,००,०००/- (रुपये पंचवीस कोटी फक्त ) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रक व अर्थसंकल्प कार्यासनाचे संदर्भ क्रमांक ४ येथील ज्ञापनान्वये केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेसाठी एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या कालावधीच्या खर्चासाठी लेखानुदानाद्वारे मंजूर केलेली रक्कम रुपये ८,३३,३२,०००/- (रुपये आठ कोटी तेहतीस लक्ष बत्तीस हजार फक्त) वितरीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी पुढे/ मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ New CO Code वर संबंधित जिल्हयाना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यांनी वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना लाभार्थ्यांच्या प्रमाणानुसार करावे. संदर्भ क्र. २ येथील परिपत्रकानुसार उणे पध्दतीने प्राधिकारपत्र काढण्यास मुभा आहे.

३. सदरहू निधीमधून झालेला खर्च " मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, १०४-वृध्द विकलांग व निराश्रीत व्यक्तींचे कल्याण, (०८)(०५) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना-दारिद्रय रेषेखालील कुटुंबाला अर्थसहाय्य (केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम), ५०-इतर खर्च (२२३५ ३००५)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र. ३ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकातील अटी व शर्तीची पुर्तता करुन कोषागारात देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

६. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

७. हा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३७४/२०१९/व्यय १४, दिनांक १५.०५.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०५१७१७२०११७८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundlik Wagh

Digitally signed by Prashant Pundlik Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=759e87fbd1e68c290a7221620636ede8425d6a870aa0240f18d726b6c8e6b832, cn=Prashant Pundlik Wagh
Date: 2019.05.17 17:27:30 +05'30'

**( प्रशान्त पुं. वाघ )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद,
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी]
६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७. वित्त विभाग, अर्थसंकल्प ७, अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
८. उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवड नस्ती, विसयो.

विवरणपत्र

शासन निर्णय, क्र.राकुला-२०१९/प्र.क्र.५०/विसयो, दिनांक : १७ मे, २०१९ सोबतचे सहपत्र

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता अनुदानाचे वितरण

राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना (रक्कम रुपयात)

| अ.क्र. | जिल्हा | नियंत्रक अधिकारी क्रमांक | लाभार्थी संख्या | एप्रिल, १९ | मे, १९ | जून, १९ | जुलै, १९ | या आदेशान्वये एकूण वितरीत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | | १० |
| १ | मुंबई शहर | N0028 | १० | ३१३९३ | ३१३९३ | ३१३९३ | ३१३९३ | १२५५७२ |
| २ | मुंबईउपनगर | N0029 | १० | ३१३९३ | ३१३९३ | ३१३९३ | ३१३९३ | १२५५७२ |
| ३ | ठाणे | N0036 | २६ | ८१६२४ | ८१६२४ | ८१६२४ | ८१६२४ | ३२६४९६ |
| ४ | रायगड | N0012 | ३८ | ११९२९६ | ११९२९६ | ११९२९६ | ११९२९६ | ४७७१८४ |
| ५ | रत्नागिरी | N0023 | ३६ | ११३०१८ | ११३०१८ | ११३०१८ | ११३०१८ | ४५२०७२ |
| ६ | सिंधुदूर्ग | N0018 | ४८ | १५०६९० | १५०६९० | १५०६९० | १५०६९० | ६०२७६० |
| ७ | पालघर | N0037 | १८१ | ५६८२२९ | ५६८२२९ | ५६८२२९ | ५६८२२९ | २२७२९१६ |
| | **कोंकण विभाग** | | ३४९ | **१०९५६४३** | **१०९५६४३** | **१०९५६४३** | **१०९५६४३** | **४३८२५७२** |
| ८ | नाशिक | N0006 | १४८ | ४६४६२९ | ४६४६२९ | ४६४६२९ | ४६४६२९ | १८५८५१६ |
| ९ | धुळे | N0026 | ३३३ | १०४५४१७ | १०४५४१७ | १०४५४१७ | १०४५४१७ | ४१८१६६८ |
| १० | जळगाव | N0010 | ५७२ | १७९५७३१ | १७९५७३१ | १७९५७३१ | १७९५७३१ | ७१८२९२४ |
| ११ | अहमदनगर | N0030 | १६४ | ५१४८६० | ५१४८६० | ५१४८६० | ५१४८६० | २०५९४४० |
| १२ | नंदुरबार | N0027 | ३०१ | ९४४९५६ | ९४४९५६ | ९४४९५६ | ९४४९५६ | ३७७९८२४ |
| | **नाशिक विभाग** | | **१५१८** | **४७६५५९३** | **४७६५५९३** | **४७६५५९३** | **४७६५५९३** | **१९०६२३७२** |
| १३ | पुणे | N0040 | १७ | ५३३६९ | ५३३६९ | ५३३६९ | ५३३६९ | २१३४७६ |
| १४ | सोलापूर | N0019 | १५७ | ४९२८८४ | ४९२८८४ | ४९२८८४ | ४९२८८४ | १९७१५३६ |
| १५ | सातारा | N0032 | १३ | ४०८१२ | ४०८१२ | ४०८१२ | ४०८१२ | १६३२४८ |
| १६ | सांगली | N0008 | ६२ | १९४६४२ | १९४६४२ | १९४६४२ | १९४६४२ | ७७८५६८ |
| १७ | कोल्हापूर | N0039 | १७ | ५३३६९ | ५३३६९ | ५३३६९ | ५३३६९ | २१३४७६ |
| | **पुणे विभाग** | | **२६६** | **८३५०७६** | **८३५०७६** | **८३५०७६** | **८३५०७६** | **३३४०३०४** |
| १८ | नागपूर | N0014 | ९९८ | ३१३३११२ | ३१३३११२ | ३१३३११२ | ३१३३१९६ | १२५३२५३२ |
| १९ | वर्धा | N0025 | १६८ | ५२७४१७ | ५२७४१७ | ५२७४१७ | ५२७४१७ | २१०९६६८ |
| २० | चंद्रपूर | N0021 | ४०३ | १२६५१७४ | १२६५१७४ | १२६५१७४ | १२६५१७४ | ५०६०६९६ |
| २१ | भंडारा | N0033 | ३४५ | १०८३०८९ | १०८३०८९ | १०८३०८९ | १०८३०८९ | ४३३२३५६ |
| २२ | गडचिरोली | N0013 | ३०३ | ९५१२३५ | ९५१२३५ | ९५१२३५ | ९५१२३५ | ३८०४९४० |
| २३ | गोंदिया | N0024 | १८१ | ५६८२२९ | ५६८२२९ | ५६८२२९ | ५६८२२९ | २२७२९१६ |
| | **नागपूर विभाग** | | **२३९८** | **७५२८२५६** | **७५२८२५६** | **७५२८२५६** | **७५२८३४०** | **३०११३१०८** |
| २४ | अमरावती | N0011 | ४६६ | १४६२९५६ | १४६२९५६ | १४६२९५६ | १४६२९५६ | ५८५१८२४ |
| २५ | अकोला | N0041 | १० | ३१३९३ | ३१३९३ | ३१३९३ | ३१३९३ | १२५५७२ |
| २६ | यवतमाळ | N0007 | ४११ | १२९०२८९ | १२९०२८९ | १२९०२८९ | १२९०२८९ | ५१६११५६ |
| २७ | बुलढाणा | N0038 | ३४९ | १०९५६४७ | १०९५६४७ | १०९५६४७ | १०९५६४७ | ४३८२५८८ |
| २८ | वाशिम | N0022 | १२६ | ३९५५६३ | ३९५५६३ | ३९५५६३ | ३९५५६३ | १५८२२५२ |
| | **अमरावती विभाग** | | **१३६२** | **४२७५८४८** | **४२७५८४८** | **४२७५८४८** | **४२७५८४८** | **१७१०३३९२** |
| २९ | औरगाबाद | N0035 | ११९ | ३७३५८७ | ३७३५८७ | ३७३५८७ | ३७३५८७ | १४९४३४८ |
| ३० | बीड | N0034 | १९७ | ६१८४६० | ६१८४६० | ६१८४६० | ६१८४६० | २४७३८४० |
| ३१ | नांदेड | N0031 | १७६ | ५५२५३२ | ५५२५३२ | ५५२५३२ | ५५२५३२ | २२१०१२८ |
| ३२ | परभणी | N0016 | ६८ | २१३४७८ | २१३४७८ | २१३४७८ | २१३४७८ | ८५३९१२ |
| ३३ | उस्मानाबाद | N0020 | ८२ | २५७४३० | २५७४३० | २५७४३० | २५७४३० | १०२९७२० |
| ३४ | जालना | N0015 | ३३ | १०३५९९ | १०३५९९ | १०३५९९ | १०३५९९ | ४१४३९६ |
| ३५ | लातूर | N0009 | ५८ | १८२०८४ | १८२०८४ | १८२०८४ | १८२०८४ | ७२८३३६ |
| ३६ | हिंगोली | N0017 | १० | ३१३९३ | ३१३९३ | ३१३९३ | ३१३९३ | १२५५७२ |
| | **औरंगाबाद विभाग** | | **७४३** | **२३३२५६३** | **२३३२५६३** | **२३३२५६३** | **२३३२५६३** | **९३३०२५२** |
| | एकूण | | ६६३६ | २०८३२९७९ | २०८३२९७९ | २०८३२९७९ | २०८३३०६३ | ८३३३२००० |